सं.फौ.ख.क्र.७१६/२०२५

जनार्दन वि. कैलास

**निशाणी – ५**

**शपथेवर पडताळणी**

माझे नांवः जनार्दन वाळुबा घुगे,

वयः ७५ वर्षे, धंदाः निरंक,

रा. शेजवळ पेट्रोलपंपाजवळ, ता. फुलंब्री आणि जि. औरंगाबाद.

शपथेवर सुरु,

दि.२४.१०.२०२५ रोजी मी चौक्यावरुन घरी गेलो होतो. दुपारी ०२.०० वाजता माझा भाऊ कैलास याने माझ्या पत्नीला म्हटले होते की, तुझ्या पतीला वावरात पाठव त्याचे हात पाय तोडतो आणि तळ्यात टाकुन देतो. त्यानंतर मी गट क्र.९ या फॉरेस्टच्या जमीनीवर गेलो व त्याला म्हटले की, तुम्ही मला पेरु देत नाही, तुम्ही कसकाय पेरत आहात. कैलासचे मुलं नामे सचिन, संतोष, कैलासची सुन अर्चना व कैलास यांना मी अस करु नका असे म्हटले असता, सचिन, कैलास व अर्चना यांनी मला पोटात, पाठीत आणि कमरेत मारले व मला अश्लील शिवीगाळ केली. कैलासची पत्नी हि खालच्च्या वावरात होती. ते लोक मला मारल असतांना ती पळत आली व तीने मला सोडवीले. माझा भाऊ हरिदासची मुलगी सविता हि देखील तेथे पळत आली आणि तिने आणि कैलासच्या पत्नीने मला घरी पाठविले. त्यानंतर मी फुलंब्री येथे आलो. तेथे पोलीसांकडे मी सदर घटनेबाबत एन.सी. घेतली. पोलीसांनी माझी सदर घटनेबाबत फिर्याद नोंदवुन घेतली नाही. त्यामुळे मी, आरोपींविरुद्ध न्यायालत तक्रार केली.

RKulkarni
10.11.2025

**(डॉ. आर. एस. कुळकर्णी)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फुलंब्री**
**दि.११.११.२०२५**

**तक्रारदाराची सही**